**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/सीएसएस शिष्यवृत्ती/२०२१-२२/3155 दिनांक : ३१.०८.२०२१

**अत्यंत महत्वाचे / तात्काळ**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२०१-२२ साठी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/सीएसएस/९७२१ दि. २७.८.२०२१.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी / मार्च २०२१ मध्ये घेतलेल्या (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नविन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode)जमा करण्यात येईल.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्तीबाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व (FAQs) काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था / विद्यालय स्तरावरुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन / सुधारित प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.inया संकेतस्थळाचे व मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in व www.jdhepune.info या संकेतस्थळाचे अवलोकन महाविद्यालयांनी आणि विद्यापीठांनी तसेच विद्यार्थ्यांनी करण्यात यावेत.

- **किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.

४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणत्याही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षांपर्यंत देय राहील.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :-**

- **नवीन मंजूरी / (Fresh)–**

  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.

  २. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

- **नुतनीकरण (Renewal)–**

  १. मागील वर्षाची गुणपत्रिका.

- **नविन मंजूरी आणि नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरी साठी व नूतनीकरणासाठी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. **विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३०.११.२०२१ ही आहे व महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक १५.१२.२०२१ हा आहे.**

३. नविन मंजूरीसाठी (Fresh) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन(Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक हा त्यांच्या बँक खात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

६. विद्यार्थ्यांचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative / Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरुन शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

७. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

८. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील .

९. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरीता सादर करावीत.

११. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदनीने पूर्ण करुन घ्यावा.

१२. या कार्यालयाचे संकेतस्थळावर वेळोवेळी परिपत्रकाद्वारे सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था यांना कळविण्यात येते. तरी सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था आणि विद्यार्थ्यांनी या संकेतस्थळाचे अवलोकन वेळोवेळी करावे.

❖ **महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-**

**१.** NSP PORTAL द्वारे सर्व महाविद्यालयांना Aadhar Base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. तरी सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले त्यांनी त्यांच्या NSP PORTAL वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर (Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय / संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रिया पध्दतीने NSP पोर्टलच्या Home Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. (KYC करण्याबाबतची प्रकीया याची सविस्तर माहिती www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. ) सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करुन त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

३. विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीच्या (Fresh) नुतनीकरणाचा (Renewal) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी / विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जाची छाननी करुन ऑनलाईन मंजूरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. संबंधित महाविद्यालयांनी उच्च शिक्षण संचालनालयाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव/ प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (Standard Operating Procedure) **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

इयत्ता १२ वी उत्तीर्ण आणि पात्र विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२१-२२ ही योजना राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व महाविद्यालय / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभागप्रमुख यांनी विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, बैठका, शिबीर घेण्यात यावेत जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थी या शिष्यवृत्तीचा लाभ घेतील यासाठी प्रयत्न करावे. तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबतच्या ऑनलाईन अर्ज करण्यासाठी येणाऱ्या अडचणींचे निराकरण करावे. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावेत तसेच उपरोक्त सूचना विद्यालय /महाविद्यालय/संस्था/ विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करण्यात यावी व त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर योजनेसाठी एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित रहाणार नाही याची गांभीर्याने दक्षता घेण्यात यावी.

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रति -
१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
८. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
१०. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्यं, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune.gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ /२९७०७०९८ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०२१/सीएसएस/ ३७२१ दि. २६.०८.२०२१

27 AUG 2021

**परिपत्रक**

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२१-२२ साठी अंमलबजावणी करणे बाबत...**

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे** (Renewal) अर्ज ऑनलाईन **(Online) पध्दतीने** मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे.

❖ **किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.
४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:-**

- **नवीन मंजूरी** / (Fresh)-
  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.
  २. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

Scanned with CamScanner

- **नूतनीकरण (Renewal)-**

१. मागील वर्षाची गुणपत्रिका.

❖ **नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि. ३०/११/२०२१** ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम **दिनांक १५.१२.२०२१** हा आहे.

३. नवीन मंजूरीसाठी (Fresh) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top २०th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोकड करुन अर्ज भरावा.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती चे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

६. विद्यार्थ्याचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative / Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

७. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

८. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील

९. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविदयालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

११. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

❖ **विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-**

१. NSP पोर्टल द्वारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. तरी सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी (Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय /संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रीया NSP Portal च्या HOME Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. (KYC करण्याबाबतची प्रक्रीया याची सविस्तर माहिती www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.) सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करून त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

Scanned with CamScanner

२. विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. संबंधित महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव /प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे.

तरी आपल्या अधिनस्थ महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सूचना देण्यात याव्यात. व केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास देण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रत,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
४. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

## जाहिरात

## भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे** (Renewal) **अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने एन.एस.पी. पोर्टलवरुन मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.** नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

नवीन मंजूरीसाठी (Fresh) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ करीता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal)अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| अ.क्र | कार्यसूची | अंतिम दिनांक<br>**नवीन शिष्यवृत्ती** (Fresh) **व नूतनीकरण शिष्यवृत्ती** (Renewal) |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ३० नोव्हेंबर, २०२१ |
| २ | महाविद्यालयाने अर्जांची ऑनलाईन पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक | १५ डिसेंबर, २०२१ |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावते.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी **www.scholarships.gov.in** हे संकेतस्थळ अवलोकन करावे. तसेच संकेतस्थळावर दिसणाऱ्या **Helpline No. 0120-6619540** या क्रमांकावर किंवा **helpdesk@nsp.gov.in** या ई-मेल वरुन संपर्क साधावा. तसेच उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील **दूरध्वनी क्रमांक 020-26126939 / 29707098** वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. **केंद्रशासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या नवीन सूचनांसाठी या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in व www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.**

**(सदर शिष्यवृत्तीबाबतची सविस्तर जाहिरात संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)**

(डॉ.धनराज माने)
नोडल ऑफिसर तथा संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

**No. D-12011/09/2021-DBT**
**Government of India/ भारत सरकार**
**Cabinet Secretariat/ मंत्रिमंडल सचिवालय**
**DBT Mission/ प्रत्यक्ष लाभ अंतरण मिशन**

4th Floor, Shivaji Stadium Annexe
Rajiv Chowk, New Delhi- 110001
Dated: August 17, 2021

**OFFICE MEMORANDUM**

**Subject: NSP Timelines for AY 2021-22.**

The undersigned is directed to refer to the meeting held under the Chairmanship of Joint Secretary (DBT), Cabinet Secretariat on 11th August, 2021 on the above-mentioned subject wherein it was decided to recommend timelines on NSP for AY 2021-22 for approval of the Competent Authority (Para 6 of the Minutes of the Meeting refers). The Competent Authority has approved the following timelines on NSP for AY 2021-22: -

| | |
|---|---|
| Opening of Portal for accepting applications | 18th August, 2021 |
| Closing of Portal for accepting Pre-Matric applications | 15th November, 2021 |
| Closing of Portal for accepting Post-Matric applications | 30th November, 2021 |
| Closing of First level verification | 15th December, 2021 |
| Closing of Second level verification | 31st December, 2021 |

(Ravi Ranjan)
Under Secretary (DBT)
Tele. 23343860 Extn: 363

To,

1. Secretary, D/o Higher Education
2. Secretary, D/o Social Justice & Empowerment
3. Secretary, M/o Minority Affairs
4. Secretary, M/o Tribal Affairs
5. Secretary, D/o Empowerment of Persons with Disabilities
6. Secretary, D/o School Education & Literacy
7. Secretary, M/o Labour & Employment
8. Chairperson, Welfare & Rehabilitation Board, MHA
9. Director General, Railways Protection Force
10. Secretary, UGC
11. Chairman, AICTE
12. Secretary, M/o Electronics & IT
13. CEO, UIDAI
14. Controller General of Accounts.
15. Director General, NIC
16. Secretary, UGC
17. Chairman, AICTE

Copy for information to: -

3. PSO to Secretary (Coord), Cabinet Secretariat